**<u>सरतपास वादीतर्फे वकील श्री.डी.एल. घोगरे यांच्यामार्फत शपथेवर सुरु:-</u>**

**१२.** माझ्या सरतपासातील मजकुर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. मी दावा मिळकत श्री. दिलीप माधवराव शेळके व सिंधुबाई आनंदराव पाटील यांच्याकडून दोन स्वतंत्र खरेदीखताने घेतलेली आहेत. दोन्ही मुळ खरेदीखते दाखल केली आहेत. खरेदीखतांवर लिहून घेणार म्हणून माझी व लिहून देणार म्हणून अनुक्रमे दिलीप माधवराव शेळके व सिंधुबाई आनंदराव पाटील यांच्या सहया आहेत. दोन्ही खरेदीखतातील मजकुर खरा व बरोबर आहे. दि.१७/१२/२००७ रोजीच्या खरेदीखताचा **<u>नि.क्र.७२</u>** देण्यात येते व दि.३१/०७/२०१३ रोजीच्या खरेदीखताला **<u>नि.क्र.७३</u>** देण्यात येते. मी फेरफार क्र.१०४१ व १२६२ ची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. दोन्ही फेरफारला अनुक्रमे **<u>नि.क्र.७४ व ७५</u>** देण्यात येतो. मी फेरफार क्र.४१५ ची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. या फेरफारला **<u>नि.क्र.७६</u>** देण्यात येते. मी प्रतिवादी क्र.१ ने दि.०१/१०/१९९३ रोजी प्रतिवादी क्र.२ ला दावामिळकतीतील गटाचे खरेदीखत करुन दिले. त्याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्या प्रतिला **<u>नि.क्र.७७</u>** देण्यात येते. मी प्रतिवादी क्र.२ ने दि.१६/०५/१९९४ रोजी प्रतिवादी क्र.३ ला दावामिळकतीतील गटाचे खरेदीखत करुन दिले. त्याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्या प्रतिला **<u>नि.क्र.७८</u>** देण्यात येते. मी फेरफार क्र.१२२६ ची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. फेरफारला **<u>नि.क्र.७९</u>** देण्यात येतो. मी तहसीलदार अहमदपूर यांनी स.क्र.२०१०/आर.ओ.आर.सी.आर.१ या प्रकरणात दि.१५/०२/२०११ रोजी निकाल दिला. त्या निकालाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्याला **<u>नि.क्र.८०</u>** देण्यात येते. मी उपविभागीय अधिकारी यांनी संचिका क्र.२०११/आर.ओ.आर./ए/३० मध्ये दि.२७/०६/२०१२ रोजी निर्णय पारीत केला, त्याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्याला **<u>नि.क्र.८१</u>** देण्यात येते. मी प्रभारी अप्पर जिल्हाधिकारी यांनी संचिका क्र.२०१२/आर.ओ.आर./ए/११४ मध्ये दि.१७/०६/२०१४ रोजी निर्णय पारीत केला, त्याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्याला **<u>नि.क्र.८२</u>** देण्यात येते. मी अपर विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी प्रकरण क्र.आर.ओ.आर./आर.ई.व्ही./३२२/२०१४ मध्ये दि.३०/१२/२०१७ रोजी निर्णय पारीत केला, त्याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्याला **<u>नि.क्र.८३</u>** देण्यात येते.त्याला **<u>नि.क्र.८२</u>**

नि.दिवाणी दावा क्र.४४७/२०१५
गोविंद वि. दिलीप
निशाणी क्र.६० वर



देण्यात येते. मी अपर विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी प्रकरण क्र.२०१८/आर.ओ.आर./रिव्युव्ह/१८० मध्ये दि.१८/०९/२०२० रोजी निर्णय पारीत केला, त्याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्याला **नि.क्र.८४** देण्यात येते. मी अहमदपूर पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या अदखलपात्र गुन्हयाची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. त्याला **नि.क्र.८५** देण्यात येतो. मी दावा मिळकत गट क्र.३३/२ च्या ७/१२ ची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. त्याला **नि.क्र.८६** देण्यात येते. मी किरकोळ चौकशी अर्ज क्र.१०/२०१५ व रे.दि.मु.क्र.३४१/२०१५ मधील प्रकरण काढून घेतल्याबाबतच्या पुरसीसच्या प्रमाणित प्रती दाखल केलेल्या आहेत. त्यांना **नि.क्र.८७ व ८८** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

स्थळ - अहमदपूर.
दिनांक- २८/११/२०२५

**( आर.डी. वाबळे )**
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
अहमदपूर.